पुणे, वार्षिक वर्गणी २०० रुपये, किंमत २० रुपये, मार्च २०२०, खंड १८, अंक १२, पृष्ठे ३२

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्‌बोधक व माहितीपूर्ण मासिक


३ ● शिंपण

५ ● 'करू भागवत धर्म'

१५ ● जपानमधील नवे 'सोलो कल्चर'

२५ ● ऊर्जावापराचे नवे पर्याय


भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

वार्षिक वर्गणी २००/- रुपये (परदेशस्थ वाचकांसाठी $ २०) वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/ चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**'अर्थबोधपत्रिका'** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.

वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध,
९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग,
(रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२, २५६५७२१०, २५६५७६९७
ई-मेलः- ispepune@gmail.com
www.ispepune.org.in

**अर्थबोधपत्रिका**
**खंड १८ (अंक १२) मार्च २०२०**
**संपादक - अभय टिळक**
**सहयोगी संपादक - पराग पोतदार**

*'अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?*

- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- निःपक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

### अर्थबोधपत्रिकेचा हेतू

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियत-कालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यतः इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.**

*अर्थबोधपत्रिका कशी साकारते?*

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.

◆अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# शिंपण

आपल्या जगण्याला आकार देण्यासाठी आपण सगळेच आपापल्या परीने झगडत असतो, यात वादच नाही. भवतालातील परिस्थिती, तिच्यातील बदल आणि त्या बदलांना आपल्याकडून दिला जाणारा प्रतिसाद या देवाणघेवाणीमधून प्रत्येकाचेच व्यक्तिमत्त्व घडत राहते. मानवी मेंदूची जडणघडण, विकास आणि कार्य यांसंदर्भात अलीकडील काळात साकारलेल्या प्रगत संशोधनाने 'नेचर' आणि 'नर्चर' हे दोन घटक मानवी मेंदूच्या आणि पर्यायाने मानवी व्यक्तिमत्त्वाच्या उत्क्रांतीस कारणीभूत ठरत असतात, असे निरीक्षण प्रतिष्ठित केलेले आहे. अगदी थोडक्यात सांगायचे तर, आपण जन्माला येताना बरोबर जे काही सारे निसर्गदत्त देणगीच्या स्वरूपात घेऊन येतो ते सगळे 'नेचर' या प्रकारात जमा होते. तर, आपल्या परिसरातील परिस्थितीमधून, भवतालच्या पर्यावरणाद्वारे, लोकव्यवहाराच्या माध्यमातून उगम पावणा-या नानाविध प्रवाहांमधून आपल्यावर जे जे संस्कार होत राहतात त्यांची गणना 'नर्चर' या गटात केली जाते. मुळात आपले 'नेचर' कसे आहे त्यांवर आपल्या होणा-या 'नर्चर'ला आपला प्रतिसाद कसा असेल ते बव्हंशी अवलंबून राहते. उपमाच द्यावयाची झाली तर, 'नेचर' ही जमीन म्हटले तर 'नर्चर' हे पाणी समजता येईल. शिंपण केल्यानंतर जमिनीमधून पीक कसे निघेल हे मूळ जमिनीचा मगदूर कसा आहे त्यांवर अवलंबून राहते. जी बाब व्यक्तीच्या मनमेंदूची तीच बाब समाजमनाची. समाजमानसरूपी भूमी कितपत मशागत केलेली आहे आणि तिच्यावर नेमके कोणत्या संस्कारांचे शिंपण कालौघात घडून येते त्यांवर त्या त्या समाजातील लोकव्यवहाराची गुणवत्ता आणि कस अवलंबून राहतो. समाजमानसरूपी भूमी आणि तिच्यावर होणारे संस्कारांचे शिंपण या दोहोंचेही संगोपन प्रयत्नपूर्वक साध्य करणे हे कोणत्याही समाजातील कर्त्या, विवेकी, उपक्रमशील आणि समाजमनस्क व्यक्तींचे जीवितध्येय असते. काळाच्या प्रत्येक टप्प्यावर विविध देशांमध्ये, त्या त्या देशांतील विविक्षित समाजसमूहांमध्ये असे लोकोत्तर प्रगल्भ प्रतिभावंत निर्माण झाल्याचा एक मोठा देदिप्यमान इतिहास



मानवसमाजाच्या गाठीला आहे. अशा अतुल कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वांनी कालपुरुषाच्या कपाळावर आपल्या कामगिरीने ओढलेल्या रेखा अमिट अशाच असतात. साधारणपणे १२व्या शतकापासून जगाच्या इतिहासामध्ये नवविचारांचे जे एक पर्व अवतरले त्याची जडणघडण अशाच लोकोत्तरांच्या मांदियाळीने घडवून आणली. युरोपच्या भूमीवर अंकुरलेल्या त्या नवपर्वाच्या आद्य धुमा-यांना 'प्रबोधन' असे म्हटले जाते. पूर्वसंचिताकडे पूर्णतः नवदृष्टीने बघण्याची प्रेरणा आणि क्षमता त्या प्रबोधन पर्वाने समाजमनाला बहाल केली. त्या पाश्चिमात्य नवचिंतनाचे शिल्पकार ठरले ते तेथील कलावंत आणि साहित्यिक. तर, पौर्वात्य नवचिंतनाची पायाभरणी केली ती समाजशिक्षणाचा वसा पेललेल्या विवेकशील संतपरंपरेने. पाश्चिमात्य आणि पौर्वात्य प्रबोधन परंपरेतील काही समांतर दुव्यांचा मागोवा घेणारे या अंकातील विवेचन विचारार्ह वाटेल अशी आशा आहे. ■■

## वाचकांना विनंती

अर्थबोधपत्रिकेचा अंक दर महिन्याच्या १०तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी - 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेत - स्थळावर उपलब्ध आहेत. संकेतस्थळाला वाचकांनी अवश्य भेट द्यावी. www.ispepune.org.in**

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

स्मरणरंजन

# ‘करू भागवत धर्म’

काळाच्या विशाल आणि विराट प्रवाहामध्ये विस्मयकारक असे काही योगायोग आढळून येतात. प्रबोधन पर्वाचा १२व्या शतकादरम्यान युरोपमध्ये प्रथम ऐकू येऊ लागलेला पायरव आणि त्याच्याच आगेमागे भारतामध्ये अंकुरू लागलेला संतविचार या दोहोंतील काही साम्यस्थळे हा असाच एक योगायोग गणावा लागेल अथवा लागतो. एतद्देशीयांच्या सत्तेचा विलय घडून येऊन ब्रिटिश अंमल तत्कालीन हिंदुस्थानात स्थिरपद झाल्यानंतर १९व्या शतकात इथे जे वैचारिक नवजागरण घडले त्याला ‘प्रबोधन’ असे संबोधावयाचे अथवा नाही, यांसंदर्भात पोथीनिष्ठ सैद्धान्तिक विश्वामध्ये मतमतांतराच्या फैरी झडत असतात. त्यांतच, १९व्या शतकातील मराठी मुलुखात जी काही वैचारिक घुसळण साकारली तिच्या पहिल्यावहिल्या पाउलखुणा, १२व्या १३व्या शतकापासून या भूमीमध्ये अंकुरलेल्या संतविचारांमध्ये शोधता येतात अथवा येतील, असे प्रतिपादन कोणी केले तर मतमतांतराचा फुफाटा अधिकच जोराने उसळावा हेही अनपेक्षित वा अतर्क्य म्हणता येणार नाही.

परंतु, तशा प्रकारचा पूर्वपक्ष मांडण्यास, उपेक्षा करता न येण्याजोगी, भरीव सामग्री सकृद्दर्शनी तरी हाताशी लागते. प्रबोधन युगाची आद्य बीजे १२व्या शतकादरम्यान युरोपमध्ये रुजत असताना त्या प्रक्रियेची म्हणून जी काही गाभामूल्ये गणली जातात, सर्वसाधारणपणे, त्याच प्रकारच्या मूल्यसंचिताचे शिंपण १२व्या-१३व्या शतकापासून मराठी भूमीमध्ये रुजलेल्या संतविचाराद्वारे घडून येऊ लागले, असे निरीक्षणवजा अनुमान उपलब्ध संदर्भसाहित्याच्या परिशीलनाद्वारे मांडता येते. या प्रक्रियेमध्ये घसघशीत योगदान दिसते ते भागवत धर्मविचाराचे. या भागवत धर्मविचाराची तात्त्विक बैठक आणि तिच्यातून उमलणारी जीवनविषयक दृष्टी ज्यांच्या कार्यकर्तृत्वाद्वारे प्रकर्षाने उमलून पुढ्यात साकारते त्या संत नामदेवांचा ७५०वा जन्मोत्सव म्हणजे सध्या चालू असलेले २०२० हे वर्ष.



अभ्यासकांनी निश्चित केलेल्या तपशीलानुसार, कार्तिक महिन्याच्या शुक्ल पक्षातील एकादशी ही नामदेवांच्या अवतरणाची तिथी गणली जाते. इंग्रजी कालमापन पद्धतीनुसार ९ नोव्हेंबर १२७० हा तो जन्मदिवस येतो. त्यामुळे, २०१९ सालातील नोव्हेंबर महिना ते २०२० सालातील नोव्हेंबर महिना हे संपूर्ण वर्ष नामदेवांच्या जन्मस्मरणाचे सप्तशतकोत्तर सुवर्णमहोत्सवी वर्ष ठरते. इ. स. १२७० ते इ. स. १३५० असे ८० वर्षांचे प्रदीर्घ आयुर्मान लाभलेल्या नामदेवांचे जीवन म्हणजे अखंड प्रयत्न आणि उदंड उद्यमशीलता यांचे मूर्तिमंत दर्शन होय. निव्वळ पारलौकिकाच्या पाठलागामध्ये संपूर्ण मध्ययुगादरम्यान मग्न झालेल्या मराठी समाजमनाला निकोप ऐहिकतेचे पाठ पढवणाऱ्या भागवत धर्मविचाराची ध्वजा महाराष्ट्राबाहेर थेट पंजाबातील घुमानपर्यंत घेऊन जाणारी समाजमनस्क विभूती, हीच नामदेवांची सम्यक् ओळख ठरावी अथवा ठरते. ‘‘समाजप्रबोधनाचा वसा स्वीकारलेला नीतीमान असा प्रगल्भ समाजशिक्षक म्हणजे संत’’, ही भागवत धर्मविचाराला अभिप्रेत असलेली संतत्वाची व्याख्या समूर्त साकार करणाऱ्या नामदेवांच्या व्यक्तित्वाचे आणि कर्तृत्त्वाचे आजच्या संदर्भात आकलन करण्यास त्यांच्या सप्तशतकोत्तर सुवर्णमहोत्सवी जन्मस्मरणानिमित्ताने प्रवृत्त होणे संयुक्तिक ठरेल.

सामाजिक, राजकीय तसेच बौद्धिक क्षेत्रांतील नवप्रवाहांची जी मालिका १२व्या शतकाच्या प्रारंभी युरोपमध्ये साकारली त्यांतच युरोपातील प्रबोधनाची आद्य बीजे रुजल्याचा दावा काही इतिहासाभ्यासक करतात. जीवनाबद्दलच्या ऐहिक दृष्टिकोनाचे अंकुरण त्या बीजांद्वारे तिथे घडून आले. मानवी अस्तित्त्व हे त्या जीवनविषयक ऐहिक भूमिकेच्या केंद्रस्थानी होते. मानवी अस्तित्त्वाची महत्ता सर्वोच्च मानणाऱ्या मानवतावादाचा उगम त्यांतूनच घडून आला. विशुद्ध मानवतावादाचा पुरस्कार करणाऱ्या बुद्धिवादी चळवळीद्वारे युरोपात प्रबोधनाची पहाट झाली, असे प्रबोधन पर्वाचे अभ्यासक मानतात. ऐहिक जीवनाबाबत कमालीचा सकारात्मक दृष्टिकोन बाळगणारे तत्कालीन समाजव्यवहारांतील सुशिक्षित समाजघटक मानवतावादाचे पुरस्कर्ते व प्रवर्तक होते. मध्ययुगादरम्यान कडव्या धार्मिक पुराणमतवादाच्या पुरत्या आहारी गेलेल्या युरोपीय समाजमनाभोवती करकचून आवळलेल्या शृंखलांमधून सुटका होण्याच्या दिशा मानवतावादाच्या पुरस्काराद्वारे उजळल्या.

## मानवतावादाचे बहुविध पैलू

प्रबोधनपर्वाचा गुरु त्वमध्य असलेल्या मानवतावादाची जी प्रेरणा युरोपामध्ये उगम पावली तिला अनेकविध पैलू होते. ते सारे पैलू व प्रबोधनपर्वादरम्यान तिथे उदयाला आलेली नवीन मूल्यप्रणाली आणि १३व्या शतकापासून मराठी मातीमध्ये शिंपणी चालू झालेली भागवत धर्मप्रणीत मूल्यप्रणाली यांच्यादरम्यान आश्चर्य वाटावा इतका सुसंवाद दिसतो. दळणवळण, संपर्क आणि संवाहन यांची त्या काळातील प्रचलीत यंत्रणा बघता, युरोपमध्ये उगम पावलेल्या त्या युगमूल्यांचा प्रभाव इथल्या समाजमनावर समांतर पद्धतीने घडून येणे अगदी सर्वतोपरी अशक्य जरी नसले तरी प्रचंड दुस्तर होते अथवा असावे, हे तर उघडच आहे. त्या पार्श्वभूमीवर, युरोपीय प्रबोधन युगादरम्यान प्रसवलेली मूल्यसंपदा आणि भागवत धर्मविचाराने जागविलेली मूल्यप्रणाली यांच्यातील साम्यस्थळे निश्चितच विस्मयचकित करणारी ठरतात. हे कसे घडले असावे, याचा उलगडा आज करणे फार अवघड आहे. साधारणपणे एकाच काळात जगाच्या वेगवेगळ्या भागांत सर्वसाधारणपणे एकाच प्रकारची मूल्यव्यवस्था अवतरण्यास कारणभूत ठरणारे पूरक घटक जगाच्या पाठीवर समांतरपणे सक्रिय बनले असावेत, एवढेच काय ते आपण या संदर्भात म्हणू शकतो. बुद्धिवादाची कास धरणा-या समाजघटकांनी युरोपीय प्रबोधनादरम्यानच्या मूल्यव्यवस्थेचे संगोपन-संवर्धन घडविले. तर, विवेकाधिष्ठित ऐहिकतेचा पुरस्कार करणा-या भागवत धर्मविचाराचे जागरण घडविणा-या मराठी संतमंडळाने इथल्या नवचिंतनाची मूस घडविली. त्या नवचिंतनाच्या आद्य शिल्पकारांचे जणू मुकुटमणी म्हणजे नामदेव.

मानवी अस्तित्त्व आणि मानवी कर्तबगारी हेच जिज्ञासेचे मुख्य प्रांत असल्याची जाणीव नवप्रचलीत मानवतावादाने तत्कालीन समाजमनात रु जविली. त्या काळातील प्रचलीत धर्मशास्त्रे आणि तत्त्वज्ञाने यांच्या शाखोपशाखांमधून, नानाविध प्रणालींमधून सत्यविषयक ज्या संकल्पना मुखर होत आलेल्या होत्या त्या संकल्पनांच्या आंतरिक ऐक्यावर तसेच त्यांच्यादरम्यान नांदणा-या सुसंवादावर मानवतावादी भूमिकेचा भर राहिला. मानवी अस्तित्त्व हे पूजनीय होय, हा त्या सा-या नवदृष्टीचा गाभा होता.



मानवी जीवनाबाबत संपूर्ण मध्ययुगात नांदणा-या भावनाप्रेरणांच्या तुलनेत या नवदृष्टीचे आगळेपण प्रकर्षाने प्रतीत होत राहिले. पूर्वजन्मांमध्ये केलेल्या पापांचे प्रायश्चित्त या जन्मामध्ये घ्यायचे असते, अशा अपराधी भूमिकेतून मानवी अस्तित्त्वाकडे बघण्याची मानसिकता ही मध्ययुगाची देणगी होती. त्यांमुळे, पश्चात्तापदग्ध, प्रायश्चित्तमय जीवन व्यतीत करत राहणे, हा मध्ययुगीन सामाजिक-सांस्कृतिक विश्वातील सर्वोच्च आदर्श गणला जात असे. मानवी जीवनाकडे बघण्याच्या या भूमिकेमध्ये प्रबोधन युगाने आमूलाग्र परिवर्तन घडवून आणले. प्रायश्चित्तमय जगण्याच्या जागेवर प्रबोधनपर्वाने प्रतिष्ठापना केली ती क्रियाशील जीवनक्रमाच्या वस्तुपाठाची. जगण्याकडे बघण्याची एक अपूर्व अशी नजरच जणू त्यांतून निपजली. या परिवर्तनाचे दोन मुख्य परिणाम झाले. मानवी प्रज्ञेचे पुनरु ज्जीवन घडण्यास त्यांमुळे चालना मिळाली, हा झाला त्यांतील पहिला भाग. तर, जीवनविषयक नवीन दृष्टिकोणाचे संगोपन निकोप बुद्धिनिष्ठतेच्या पायावर घडून येण्यास सुरु वात झाली, ही त्यांतील दुसरी कमाई.

प्रबोधनपर्वाने प्रवर्तित केलेल्या मानवतावादी जीवनदृष्टीची सर्वांत मोठी आणि महत्त्वाची परिणती म्हणजे केवळ पारलौकिक निःश्रेयसावरच खिळून राहिलेली तत्कालीन समाजमनाची दृष्टी इहवादी बनण्याची प्रक्रिया चालू झाली. चर्च आणि चर्चमधील धर्मगुरूंच्या माध्यमातून प्रसृत होणा-या आज्ञा, दैव आणि देवविषयक जाणिवा, पापपुण्याचे संकेत यांच्या कुंपणांमध्ये बंदिस्त बनलेला लोकव्यवहार हळूहळू मोकळा होण्याला सुरु वात झाली. सभोवतालच्या व्यवहारासंदर्भातील मुक्त जिज्ञासेची कवाडे त्यांतून सताड खुली बनली. समाजमनाच्या भाबड्या श्रद्धेला चिकित्सेची जोड लाभली. ऐहिक लोकव्यवहारातील मानवी कर्तृत्वाबद्दल समाजमानसाला खात्री वाटायला लागली. याचा परिणाम म्हणजे त्यांतून लोकव्यवहाराचा पोत बदलायला सुरु वात झाली. दिवसातील बहुतांश वेळ पारलौकिक बाबींशी संबंधित क्रियाकर्मांमध्येच व्यतीत करण्याकडे झुकलेला कल पालटू लागला. ऐहिक जीवनाला हातभार लागेल अथवा लागावा अशी कामे करण्याकडे सर्वसाधारण जनमानस प्रवृत्त बनू लागले. निकोप आणि जबाबदार अशी ऐहिकता या सगळ्या घडामोडींमधून साकारली आणि प्रतिष्ठित बनली.

**नवचिंतनाची पार्श्वभूमी**

मानव आणि देव यांच्यादरम्यानच्या नात्याचा पूर्णपणे नवीन भूमिकेतून पुनर्विचार, हा प्रबोधन युगातील नवचिंतनाचा गाभा होय. मुक्तीसाठी मनुष्यमात्राने अहोरात्र प्रयत्नशील राहिले पाहिजे, या भावनेचा प्रचंड पगडा तत्कालीन सर्वसामान्यांवर होता. केवळ इतकेच नाही तर, अशा मुक्तीसाठी आवश्यक असणारी प्रगल्भता केवळ आणि केवळ चर्च व चर्चचे अध्वर्यू असणारे धर्मगुरूयांच्यापाशीच काय ती असते, अशीही समाजमनाची त्या काळी प्रगाढ धारणा होती. मुक्तीसाठी अनिवार्य असलेल्या प्रज्ञेची मक्तेदारी चर्च आणि धर्मगुरू यांच्याकडेच असते अथवा आहे, या प्रस्थापित समजाबाबत प्रश्नचिन्ह उभे करत प्रबोधन युगाच्या प्रारंभपर्वातील चिकित्सेचा उदय घडून आला. मानवी शक्ती-बुद्धीच्या विकासाची चरमसीमा गाठण्याची ऊर्मी व तसा आदर्श प्रबोधन युगाच्या आगमनाद्वारे प्रसवलेल्या मानवतावादाने समाजापुढे उभा केला. समजुतदारपणा, परोपकार, दया, कणव, अनुकंपा यांसारख्या निखळ मानवी मूल्यांचे जागरण-संगोपन-संवर्धन त्याच मानवतावादाद्वारे लोकव्यवहारात स्थिरावू लागले. विचार आणि तारतम्यपूर्ण विचारातून साकारणारी कृती यांचे साहचर्य मानवतावादाला अपेक्षित होते. पोपटपंचीप्रधान, पुस्तकी शब्दबंबाळपणा आणि धर्मशासकांनी त्यांना लाभलेल्या धार्मिक सत्तेचा केलेला गैरवापर या दोन बाबी टाळत पूर्वकालीन ख्रिस्ती धर्मविचाराची पुनर्स्थापना करण्यास इरॅस्मस्सारखे प्रगल्भ बुद्धिवादी प्रबोधन पर्वाच्या प्रथम चरणात मग सरसावले. तर, मध्ययुगात उदंड बोकाळलेल्या बौद्धिक शब्दच्छलाला नकार देत अभिजात अशा ग्रीक व रोमन साहित्यातील नैतिक मूल्यांचा स्वीकार करण्याचा वस्तुपाठ समाजमनापुढे ठेवत पेट्रार्कसारख्या समाजमनस्कांनी मध्ययुग आणि प्रबोधन पर्व यांना जोडणारा मानवतावादाचा सेतू बुलंद बनविण्याचे शिवधनुष्य ताकदीने पेलले.

साधारणपणे १२व्या शतकापासून युरोपामध्ये साकारू लागलेल्या या नवचिंतनाशी साधर्म्य दर्शविणारे नवप्रबोधन भागवत धर्मविचारातील मूल्यसंचयाने मराठी सांस्कृतिक विश्वामध्ये कसे प्रवर्तित केले, याचे आकलन या सगळ्या पार्श्वभूमीवर करून घेणे या टप्प्यावर उचित ठरेल.



मध्ययुगीन महाराष्ट्रातील सामाजिक-सांस्कृतिक-धार्मिक पर्यावरणच केवळ नव्हे तर सर्वसामान्य लोकव्यवहारही, जवळपास, प्रबोधनपूर्व काळातील युरोपसारखाच होता. फरक असेल तर तो निव्वळ संस्थात्मक. धर्मशरण मानसिकता आणि पुराणमतवाद दोन्हीकडे तितकाच बळकट होता. युरोपात सांस्कृतिक-धार्मिक वर्चस्व होते ते ‘चर्च’नामक बलशाली संस्थेचे. तर, मध्ययुगीन महाराष्ट्रावर वैचारिक-सांस्कृतिक अंमल होता तो वणवर्चस्वप्रधान धर्मप्रणालीचा. जन्मजात जातवर्णभेदानुसारी उतरंडमय व्यवस्था लोकव्यवहारात नांदणा-या त्या वैचारिक पर्यावरणामध्ये उतरंडीच्या तळाशी असणारे आणि उतरंडीच्या कक्षेबाहेर ठेवलेले समाजसमूह सर्व प्रकारच्या गुलामीचे बळी होते. केवळ गुलामीचेच बळी नव्हे तर तिच्यातून निपजणा-या विषमतापूर्ण लोकव्यवहाराचे आणि त्यांत अनुस्युत असणा-या पिळवणुकीचेही.

पूर्वजन्मामध्ये केलेल्या भल्याबु-या कर्मांचे फळ प्रत्येक जीवाला या पृथ्वीतलावर भोगायला लागते आणि हातून घडणा-या प्रत्येक कर्माचे फळ त्याला सदैव चिकटलेले असल्याने कर्मांची साखळी कधीच न संपणारी असते, हा कर्मविपाकाचा सिद्धान्त पारंपरिक धर्मधारणेने प्रत्येकाच्या मनावर पक्का बिंबवलेला होता. परिणामी, मागच्या कोणत्या तरी जन्मात केलेल्या पापाचे फळ भोगून संपविण्यासाठी आपल्याला जन्म घ्यावा लागलेला आहे, अशा अपराधभावाचा गंड सगळ्यांनाच कमी-अधिक प्रमाणात घेरून राहिलेला असे. जन्ममरणाच्या या फे-यातून सुटका होण्यासाठी मोक्षाची साधना करणे, हीच माणसाच्या जन्माची इतिकर्तव्यता गणली जात असे. मोक्षप्राप्तीसाठी ज्ञान हेच एकमात्र अमोघ साधन असल्याचा पुकारा यच्चयावत धर्मशास्त्रे करत असत आणि तत्कालीन समाजव्यवस्थेने ज्ञानाचा अधिकार फक्त उच्चवर्णियांना बहाल केलेला होता. उतरंडप्रधान समाजव्यवस्थेमध्ये चौथ्या वर्णात गणले जाणारे शूद्र आणि चारही वर्णांतील स्त्रिया यांना ज्ञानप्राप्तीचा अधिकार तत्कालीन धर्मव्यवहाराने पूर्णपणे नाकारलेला होता. मोक्षसाधनेसाठी कराव्या लागणा-या कथित कर्मकांडांचे आणि ती करणा-या याज्ञिकांचे प्रचंड वर्चस्व लोकव्यवहारावर होते. अशा परंपराशरण आणि विषमतापूर्ण वातावरणापायी एकंदर समाजव्यवस्थाच कमालीची स्थितिशील, पूर्वगौरवशाली आणि दांभिक बनलेली होती.

## भागवत धर्मविचाराचा उतारा

समाजव्यवहारातील ही कोंडी फोडण्यासाठी संतमंडळाने उतारा शोधून काढला भागवत धर्मविचाराचा. संकुचित, वर्णवर्चस्ववादी, उतरंडप्रधान, कर्मकांडप्रवण, भेदमूलक आणि विषमतापूर्ण अशा तत्कालीन व्यवस्थेला पूर्णपणे नवीन पर्याय उभा करण्यासाठी संतमंडळाने उपयोजन घडवून आणले ते भागवत धर्मविचाराचे. त्या नवव्यवस्थेच्या निर्मितीसाठी आवश्यक असणारे तत्त्वज्ञानात्मक अधिष्ठान उभे केले ते ज्ञानदेवांनी. तर, तो मूल्यठेवा व्यवहारात उतरविण्यासाठी संस्थात्मक संरचना उभी केली ती नामदेवांनी. आपण जगतो ते जग आभासी, मायामय नसून ते पूर्णतः सत्य आहे एवढेच केवळ नव्हे तर, या जगाच्या पलीकडे, या जगापेक्षा श्रेष्ठ असे दुसरे कोणतेही जग नाही अशी अत्यंत स्पष्ट आणि विशुद्ध इहवादी जीवनदृष्टी प्रस्थापित करणारे शैवागमप्रणित चिद्विलासाचे तत्त्वज्ञान प्रतिष्ठित करत ज्ञानदेवांनी वेदांताला एक पर्यायी सैद्धान्तिक प्रारूप उभे केले. या पृथ्वीतलावर माणुसपण जपणे हे प्रत्येक मनुष्याचे आद्य कर्तव्य आहे, या जाणिवेचा उगम घडण्यास त्यांमुळे भूमी तयार झाली.

मनुष्याचे या पृथ्वीवरील अस्तित्त्व सर्वोच्च मानणाऱ्या युरोपीय प्रबोधनाद्वारे प्रसृत झालेल्या मानवतावादाने, त्याच मनुष्यप्राण्याचे सर्वांगीण उन्नयन घडवून आणण्याचा आदर्श डोळ्यांपुढे ठेवलेला होता. याच भूमिकेला जवळपास समांतर असणारा विचारव्यूह मराठी विचारविश्वात रुजविण्यास भागवत धर्मविचाराने सुरुवात केली. ज्ञानदेवांनी मुखर केलेल्या चिद्विलासाच्या तत्त्वदृष्टीद्वारे त्याची पायाभरणी घडून आली. जगण्याच्या निव्वळ प्राथमिक गरजा भागवण्यातच मनुष्यजन्म खर्च करण्यात हशील नाही, असा इषारावजा सल्ला ज्ञानदेव ***दुर्लभुरे दुर्लभुरे दुर्लभु संसारू तुम्हीं कां नेणां । आहारनिद्रेसाठीं दवडितां माणुसपणा ।।*** अशा शब्दांत देतात, हे या संदर्भात मननीय ठरते. 'माणुसपण' जपण्यासाठी, शरीराच्या किमान गरजा भागविण्यापलीकडेही अधिक काही तरी करणे गरजेचे आहे ही भावना रुजवित असतानाच, माणसाचा जन्म मिळणे हे दुर्लभ आहेच परंतु, 'माणुसपण' हस्तगत करणे हे तर त्यांहूनही अधिक अवघड आहे, असेही ज्ञानदेव ***'दुर्लभ दुर्लभ संसार त्यांत दुर्लभ माणुसपण'***, अशा शब्दांत अधोरेखित करतात.



ऐहिक जगण्याकडे बघण्याचा हा पूर्णतः नवीन आयाम होता. इहलोकामधील जीवनाबाबत मध्ययुगीन युरोपात ज्या प्रमाणे एक प्रकारची अपराधी अथवा प्रायश्चित्तमय भावना सर्वसामान्यांच्या मनात नांदत असे सर्वसाधारणपणे तशाच प्रकारची भूमिका, निवृत्तिप्रधान जीवनाचे माहात्म्य मनावर बिंबवणाऱ्या पारंपरिक निगमप्रणित विचारव्यूहाने इथे स्थिर केलेली होती. ऐहिक जीवन म्हणजे पूर्वकर्मांची शिक्षा नसून तो विलास आहे, त्या जगण्याचा आनंद घ्यावयाचा असतो, असा पर्यायी विचारव्यूह ज्ञानदेवकथित आगम तत्त्वदृष्टीने १३व्या शतकातील समाजमानसाच्या पुढ्यात मांडून युगप्रवर्तनाचे संकेत प्रसृत केले. साहजिकच, ऐहिक जगणे हा मोक्षप्राप्तीच्या प्रवासादरम्यानचा केवळ एक थांबा आहे, ही जगण्यामागील तिथवर पोसली गेलेली भावना बदलण्याच्या वाटा त्यांमुळे प्रशस्त बनू लागल्या. इहलोकातील जगणे अधिक अर्थपूर्ण, समाधानी, उन्नत बनविण्यासाठी झटणे ही विवेकशीलतेची खूण गणण्याची दृष्टी भागवत धर्माने प्रदान केली. विवेकशीलतेचे हे भान जपत समाजजीवन प्रगल्भ बनविण्यासाठी आयुष्य झिजवणाऱ्या विभूतीला 'संत' हे बिरुद भागवत धर्मविचाराने बहाल करावे, हे या संदर्भात लक्षणीय ठरते. पारंपरिक धर्मविचारातील जुनाट, स्थितीशील आणि भेदकारक अंशांबाबत प्रश्न उपस्थित करण्याचे भान आणि धैर्य याच विवेकशीलतेद्वारे समाजव्यवहारात निपजायला लागले. परंतु, त्यासाठी प्रथम माणुसपणाची जाणीव आणि ते माणुसपण जपण्याची जबाबदारी व्यापक स्तरावर जागृत करणे, हा एक मोठाच टप्पा बाकी होता.

ज्ञानदेव-नामदेवांच्या समकालीन धर्मविचाराने मुदलात किमान माणुसपण नाकारलेलेच समाजघटक बहुसंख्य होते. ज्ञान, ज्ञानसंपादनाची साधने, संपत्ती, गावगाड्यात स्थान, लौकिक, लोकव्यवहारात किमान मान, प्रतिष्ठा...नाकारलेल्या समाजघटकांना त्यांच्या मानवी अस्तित्त्वाची स्वायत्त अशी सार्वभौम आत्मखूण प्रथम प्रदान करणे हेच भागवत धर्ममूल्यांची पताका खांद्यावर घेतलेल्या संतमंडळापुढील मुख्य व आद्य आव्हान होते. ते आव्हान पेलले नामदेवांनी. ***'आह्मी दैवाचे दैवाचे । दास पंढरीरायाचे ।।'*** असा पुकारा करत, इहलोकातील मानवी अस्तित्त्वाला सज्जड प्रतिष्ठा प्राप्त करून देत नामदेवांनी पहिले पाऊल उचलले.

### कष्टकरी प्रापंचिक दैवत

पारलौकिक श्रेयसाच्या प्राप्तीसाठी कर्मकांडे करण्याइतपत वेळ, पैसा आणि धार्मिक अनुमती गाठीशी नसलेल्या बहुजन समाजाला, तो दररोज करत असलेल्या काबाडकष्टांच्या साधनेद्वाराच प्रसन्न होणारे असाधारण दैवत सुप्रतिष्ठ करीत नामदेवांनी दुसरे पाऊ ल उचलले. पंढरपूरचा पांडुरंग हा जरी आठव्या-नवव्या शतकापासून दैवतमंडलामध्ये विख्यात पावलेला असला तरी त्याचे असे आगळेवेगळे ‘देव’पण प्रस्थापित केले ते नामदेवांनीच. महाविष्णूचा अवतार गणला गेलेला असला तरी पंढरीच्या पांडुरंगाचे ‘विठ्ठल’ हे नाव ना संध्येच्या २४ नावांत दिसते ना विष्णुसहस्त्रनामांत आढळते! विठ्ठलाचे हे आगळेवेगळेपण नामदेव, ***चोविसांवेगळे सहस्त्रां आगळे*** अशा शब्दांत नोंदवितात. आपल्या भक्ताने सर्वसंगपरित्याग करावा, घरदारकुटुंब यांच्यावर तुळशीपत्र ठेवावे, अशी हा देव अपेक्षा धरत नाही. उलट, भक्ताच्या कष्टांचा भार आपल्या परीने कमी करण्यासाठी तो मदत करण्यास कसा तत्परतेने सरसावतो हे नामदेव पूर्वकालीन दाखले देऊ न अनेक अभंगांद्वारे सांगतात. पंढरपूरला पुंडलिकासाठी आलेला हा देव पूर्वावतारात बळीच्या दरवाजात द्वारपाल म्हणून उभा ठाकला, याने धर्मराजाच्या राजसूय यज्ञादरम्यान भोजनाच्या पंगतींमध्ये पाणी वाढले इतकेच केवळ नाही तर उष्ट्या पत्रावळीही गोळा केल्या, अर्जुनाच्या रथाचे घोडे यानेच वागवले...असे याच्या ‘देव’पणाचे आगळे आयाम नोंदवत नामदेवांनी ‘कष्टकरी प्रापंचिक देव’ ही विठ्ठलाची प्रतिमा समाजमानसामध्ये प्रकर्षाने प्रतिष्ठित केली. भागवत धर्माने प्रसृत केलेल्या इहवादी जीवनदृष्टीचा सन्मान करणारे असे आगळे दैवत प्रस्थापित करणे, हे नामदेवांचे त्या प्रबोधन पर्वाला एक मुख्य योगदान ठरते.

तीर्थयात्रा केल्याने गाठीशी पुण्य जमा होते आणि देह पडल्यानंतर स्वर्गलोकामध्ये जीवाला घेऊन जाण्यास हेच पुण्य कामी येते, ही मध्ययुगातील एक प्रधान धर्मधारणा. त्या पार्श्वभूमीवर, भागवत धर्माचे आराध्य दैवत असणा-या विठ्ठलाच्या पंढरपूर या क्षेत्राचे नामदेववर्णित आगळेपणही भागवत धर्माने प्रवर्तित केलेल्या ऐहिक जीवनदृष्टीशी संवादी असेच आहे. मोक्ष अथवा स्वर्गप्राप्ती सुलभ बनविणे हे पंढरपूर तीर्थाचे मुख्य वैशिष्ट्य नव्हे,



तर, तिथे जाणा-या प्राणिमात्रांची बुद्धी विशुद्ध बनविणे हा पंढरपूर क्षेत्राचा खरा महिमा होय, असा नामदेवांचा सांगावा आहे. ***“ऐसें तीर्थ कोणीं दाखवा निर्मळ । जेथें नासे मळ दुष्टबुद्धी ।।”*** हे नामदेवांचे उद्‌गार या संदर्भात मननीय ठरतात. कोणाच्याही ठिकाणी वसणारी दुष्टबुद्धी एकंदरच लोकव्यवहार नासून टाकण्यास कारणीभूत ठरत असते. त्यांमुळे, ऐहिक जीवन निकोप बनवायचे असेल तर प्रथम दुर्बुद्धीचे निवारण घडवून आणावयास हवे आणि तीर्थयात्रेचा मूळ व मुख्य हेतू तोच होय, हेही नामदेव इथे सूचित करतात.

मानवकेंद्रितता हा युरोपीय प्रबोधनपर्वाचा गुरुत्वमध्य होता. प्रबोधन युगाने प्रवर्तित केलेल्या मानवतावादाचा उगम त्याच मानवकेंद्रिततेमधून घडला. मनुष्यप्राण्याचे पृथ्वीवरील अस्तित्त्व गहर्णीय नाही, ही भावना मानवी जाणिवेमध्ये प्रस्थापित करणे ही त्या सगळ्या परिवर्तनाची फलश्रुती. मोक्ष हीच अंतिम जीवननिष्ठा मानणा-या मध्ययुगीन मूल्यचौकटीचा पगडा असणा-या काळात, निदान भक्तीच्या प्रांतापुरता तरी, मोक्षविचार अप्रस्तुत असल्याचा पर्यायी विचारव्यूह भागवत धर्माने प्रवर्तित केला. आपल्या ठिकाणी असणारी दुष्टबुद्धी शुद्ध करू न घेण्यासाठी पंढरीला येणारे भाविक मोक्षाला कणभरही गणत नसल्याने हवालदिल झालेले मोक्षमुक्ती पंढरीच्या रस्तोरस्ती दीनवाणे फिरत असतात, असा भक्तिमय जीवनातील ऐहिकतेचा जोरकस पुकारा नामदेव,

***मुक्तिपद कोणी नेघे फुकासाठीं ।***
***हिंडे वाळ्वंटीं दीनरूप ।।***
***भक्तांचिया पायां पडतो पुढतां पुढती ।***
***मज करा सांगतीं मोक्ष म्हणे ।।***

इतक्या ऊ र्जस्वल शब्दांमध्ये करतात.

युरोपातील प्रबोधन युगाने व्यक्तीची स्वायत्तता सर्वोच्च मानली. भारतीय दर्शन परंपरेवर एकंदरीनेच प्रचंड पगडा असलेल्या वैदिक विचारव्यूहही व्यक्तिकेंद्री असाच होता व आहे. मोक्षसाधना हा त्या विचारव्यूहाचा केंद्रबिंदू. या पृथ्वीवर जन्म घेतलेल्या मनुष्याने मोक्ष हेच

***(कृपया पृष्ठ क्रमांक २१ पाहावे)***

**सामाजिक**

# जपानमधील नवे 'सोलो कल्चर'

जपान म्हटले की पहिल्यांदा आठवते ते हिरोशिमा-नागासाकी आणि त्या विध्वंसानंतर त्या देशाचे राखेतून उभे राहणे. एकमेकांना साथ देत आपण पुढे जायला हवे हा मंत्र जपत या देशाने शून्यातून पुन्हा नव्याने विश्व निर्माण केले. एकीकडे भौतिक प्रगती आणि विकास साधत असताना जपानी समाजव्यवस्थाही तितकीच महत्त्वाची मानली. परंपरेने चालत आलेला मूल्य ठेवा जपण्यावरही भर दिला. परंतु, गेल्या दशकभरापासून मात्र याच जपानमध्ये काही महत्त्वाचे सामाजिक बदल घडून येताना दिसत आहेत. एका बाजूला येथील कुटुंबव्यवस्थेच्या चौकटींना आता तडे जाऊ लागले आहेत तर दुसरीकडे येथील नवी युवा पिढी जुन्या बंधनांना झुगारते आहे आणि एकट्याच्या बळावर आपले अनुभवविश्व स्वायत्तपणे विस्तारू पाहते आहे. या बदलांना पूरक सोयी-सुविधा जपानमध्ये वाढू लागलेल्या आहेत. एकाकी जगण्याला प्राधान्य देणारी आणि समूहापेक्षा एकट्याने स्वतःपुरता आनंद उपभोगण्यावर भर देणारी नवी जीवनशैली अंगवळणी पडू लागली आहे. त्यामुळे, समाजप्रिय जपानमधील हे एक नवे सामाजिक स्थित्यंतर असल्याचे मानले जाते आहे. हे नवे बदल जपानपुरतेच मर्यादित राहणार नसून हळूहळू बहुसंख्य देशांत हे नवे 'सोलो कल्चर' पसरणार असल्याचा अंदाज समाजशास्त्राचे अभ्यासक वर्तवत आहेत.

अनेक महत्त्वाच्या मोठ्या शहरांत हॉटेलांपासून ते खासगी संगीतमैफिलीपर्यंत आणि 'नाइटलाइफ'पासून ते पर्यटनापर्यंत सर्वच ठिकाणी एकेकट्याने येऊन स्वतःपुरता अनुभव घेण्यास प्राधान्य देणा-या जपानी लोकांसाठी विशेष सुविधा आता जपानमध्ये सुरू करण्यात आली आहे. कारण अशा लोकांची संख्या अलीकडे दिवसेंदिवस वाढू लागली असल्याचे संबंधितांच्या लक्षात आले आहे. एकट्यासाठी स्वतंत्र सुविधेचा आग्रह धरणा-या जपानी लोकांमध्ये अर्थातच नव्या पिढीतील जपानी तरुणांची संख्या अधिक आहे.



'बीबीसी' वृत्तवाहिनीचे जपानमधील प्रतिनिधी Gen J यांनी या बदलत्या वास्तवाचा सखोल अभ्यास करून त्याच्या विविध बाजू समजून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. जपानमध्ये झपाट्याने बदलू पाहत असलेली ही नवी जीवनशैली जपानमधील पारंपरिक सामूहिक जीवनाला उभा छेद देणारी ठरते आहे. मात्र, हे बदल अपरिहार्य असून आगामी काळात केवळ जपानमध्येच नव्हे तर जगभरातील सगळ्याच देशांमध्येही असेच एकेकट्याने जगणारे लोक वाढत जातील असा समाजशास्त्रज्ञांचा अंदाज आहे.

Gen J यांनी केलेल्या अभ्यासानुसार, अगदी दशकभरापूर्वी जपानमधील चित्र खूप वेगळे होते. एखाद्या हॉटेलमध्ये अगर शाळा-महाविद्यालयांत दुपारी जेवणाच्या वेळी कुणी एकटाच जेवायला बसलेला दिसला तर ते सामाजिक शिष्टाचारांना धरून असल्याचे गणले जात नव्हते. अशा व्यक्तीकडे काहीशा वेगळ्या नजरेने पाहिले जायचे. याचा सामाजिक दबाव त्या व्यक्तीच्या मनावर निर्माण व्हायचा. ज्यांच्याकडे एकट्याने जेवण्याशिवाय पर्याय नाही असे लोक सार्वजनिक ठिकाणी लोकांच्या रोखलेल्या नजरा सहन करण्यापेक्षा आपल्याला कुणी पाहणार नाही अशा जागा शोधायचे. प्रसंगी चक्क एखाद्या स्वच्छतागृहाजवळ आडोशाला थांबून जेवण उरकायचे. एकट्याने जाऊन असे जेवण्याच्या पद्धतीला जपानमध्ये Benjo Meshi अर्थात 'टॉयलेट लंच' असे म्हटले जाऊ लागले. गेल्या दशकभरात मात्र हे चित्र बदलू लागले आहे. वाढत्या पर्यटनामुळे मनोरंजनाचे अनेकानेक पर्याय उपलब्ध झालेले आहेत. प्रत्येक वेळी समूहानेच आनंद उपभोगण्याऐवजी स्वतःच्या विश्वात रमण्याचा आग्रह धरणा-या जपानी लोकांची संख्या वाढते आहे. त्यामुळे आता गर्दीच्या ठिकाणीही व्यक्तिगत स्वातंत्र्य जपणा-या जागा राखून ठेवल्या जाऊ लागल्या आहेत. त्याहून विशेष म्हणजे, या नव्या बदलांना आता समाजमान्यताही मिळू लागली आहे.

काही उपहारगृहांनी ही गरज अगदी पहिल्यांदा ओळखली. टोकियोमधील Hitori नावाचे गर्दीने गजबजलेले एक हॉटेल. जपानमधील तरुणाई इथे रात्रभर जल्लोष करीत असते. कायम गजबजाट असणा-या या हॉटेलने मात्र, एखाद्याला रात्रीचा आनंद एकाकीपणे मिळवायचा असेल

तर अशा लोकांसाठी खास स्वतंत्र बैठक व्यवस्था सुरू केली. त्याला अपेक्षेपेक्षा अधिक प्रतिसाद मिळाला. पाठोपाठ जपानमध्ये अनेक उपहारगृहांनी तोच कित्ता गिरवला. स्वातंत्र्य उपभोगू पाहणा-या जपानी लोकांची घुसमट यातून दूर झाली. 'सोलो सर्व्हिस' हा जपानमध्ये आता कळीचा शब्द बनू लागला आहे. गेल्या दशकभरातील हा एक मोठा बदल आहे. प्रस्थापित सामाजिक चौकटीला या बदलाने धक्का दिला आहे.

जपानमधील तरुण पार्टी-पबमध्ये मित्रांसोबत रमतात. पण अनेकदा त्यांना सोबत कुणीच नको असते. स्वतःला वेळ द्यावासा वाटत असतो. अशा वेळी, एकेकट्यासाठी केलेल्या या जागा त्यांना ते स्वातंत्र्य आनंदाने उपभोगू देतात. अनेक जपानी युवक रात्री घरातून बाहेर पडल्यावर गर्दीत जाण्याऐवजी स्वतःला आनंद देणारी खास एकट्यासाठीची जागा शोधत असतात. गर्दी टाळणा-या, स्वतःमध्ये रममाण होणा-या तरुणांची संख्या जपानमध्ये वाढते आहे. त्यामुळेच व्यक्तिगत स्वातंत्र्य उपभोगू देणारी 'सोलो पॉलिसी' तिथे अतिशय प्रभावी ठरत असल्याचे दिसून येते आहे. हे चित्र केवळ हॉटेलांमध्येच दिसून येते असे नव्हे; तर 'नाइटलाइफ'मधील विविध सेवा, रात्रीच्या मुक्कामाच्या जागा, पर्यटनाच्या सुविधा अशा सर्वच ठिकाणी 'Hitori' अर्थात 'फक्त एकाच व्यक्तीसाठी' ही संकल्पना रुजू लागली आहे. जपानी लोकांची वाढती मागणी लक्षात घेऊन आता हे स्वातंत्र्य उपभोगू देण्यासाठी नवनवीन क्लृप्त्या व्यावसायिक पातळीवर लढवल्या जात आहेत. त्यासाठी 'Ohitorisama' हा जपानी शब्द आता प्रचलित होतो आहे. 'पार्टी करायची असेल तर ती सुद्धा एकट्यानेच' असा त्याचा अर्थ होतो. एकट्याने जेवण करणे, चित्रपट पाहणे, तंबूमध्ये राहणे याकडे जपानी युवकांचा कल वाढत असल्याचे अभ्यासकांचे निरीक्षण आहे. जपानमधील काही उपहारगृहांनी तर 'खास तुमच्यासाठी' म्हणून एकेका व्यक्तीसाठी त्याच्या अथवा तिच्या पसंतीचे वेगळे पदार्थ बनवण्यास सुरुवात केलेली आहे. अर्थातच, जपानी लोकांनी ही कल्पनाही उचलून धरली आहे. जपानी लोकांसाठी असणा-या मनोरंजनाच्या सुविधाही अपवाद राहिलेल्या नाहीत. गटाने मिळून गाणी सादर करण्यापेक्षा 'सोलो परफॉर्मन्स'ला अधिक मागणी आहे. त्यामुळे ऑर्केस्ट्रा किंवा सामूहिक



संगीत मैफिली आताशा मागे पडत आहेत. एकल संगीतवाद्य वाजवणा-या अथवा गीत सादर करणा-या गायकांना आता मागणी अधिक आहे. पूर्वी खासगी संगीत मैफिलींसाठी अनेक इमारतींमध्ये मजलेच्या मजले राखून ठेवलेले असत. परंतु, गेल्या काही वर्षांतील बदल लक्षात घेऊन त्यांची जागा स्वतंत्रपणे ध्वनिमुद्रण करता येईल अशा छोटेखानी स्टुडिओंनी घेतली आहे.

**सामाजिक दबाव**

सामाजिक बांधिलकी आणि समूहजीवनाला प्राधान्य देणा-या जपानी संस्कृतीमध्ये अशा प्रकारे एकाकी जीवनाची ओढ वाढणे हे एक मोठे सामाजिक स्थित्यंतर आहे, असे समाजशास्त्रज्ञांचे मत आहे. Nomura Research Institute ही सामाजिक आणि अर्थकारणाचा अभ्यास करणारी जपानमधील सर्वांत मोठी संशोधन संस्था आहे. या संस्थेतील वरिष्ठ अभ्यासक Motoko Matsushita या जपानमधील बदलत्या मानसिकतेचे मूळ आणि त्या मागची कारणे यांचा अभ्यास करीत आहेत. त्यांच्या मते, जपान हा लहान देश आहे आणि त्यामुळे सर्वजण सहजीवन आणि सहअस्तित्व मानणारे आहेत. परंतु, जपानी समाजात, विशेषतः, तरुणांमध्ये दिसून येणा-या बदलांमागे सामाजिक दबाव हे एक महत्त्वाचे कारण असावे. त्यामुळे समूहामध्ये राहताना, वावरताना कोणत्या प्रकारचे सामाजिक दबाव जाणवतात यांचा सखोल अभ्यास होऊन त्यात सुधारणा करणे आवश्यक आहे, असे Motoko Matsushita यांचे मत आहे. समाजमाध्यमांचे फुटलेले पेव आणि दिवस-रात्र गुंतवून ठेवणारी आभासी संवादसंस्कृती यातूनही समाजाशी असणारे बंध हळूहळू सैल होत असावेत आणि आणि त्यातूनच समाजव्यवस्थेचा एक भाग असतानाही अलिप्तपणे जगण्याकडे कल वाढत असावा. आभासी जगात वावरत असताना वास्तवाशी नाळ तुटत असल्याने प्रत्यक्षात लोकांमध्ये वावरतानाही संवादातील सहजता हरवून जात असावी आणि प्रत्यक्ष संवादाला मर्यादा येत असाव्यात, असे निष्कर्ष Motoko Matsushita यांनी अभ्यासाद्वारे मांडले आहेत. आवडते म्हणून कुणी स्वच्छतागृहाजवळ बसून जेवत नाही. आपल्या सोबत कुणीही नाही, याकडे सर्वांचे लक्ष आहे, या विचारांचा दबाव त्यांच्या मनावर निर्माण

होतो आणि मग शेवटी स्वच्छतागृहाजवळ वा जिथे मिळेल तिथे जागा शोधून कुणाच्या नजरेस पडणार नाही अशा पद्धतीने जेवण उरकले जाते. जपानमधील काही समाजशास्त्रज्ञ मात्र या विश्लेषणाचे खंडन करतात. त्यांच्या मते, अशा प्रकारची काही उदाहरणे नक्कीच समोर येत आहेत परंतु त्याला सामाजिक बदल म्हणण्याची घाई करू नये. व्यक्तीची मनःस्थिती हा त्यातील महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे एकाकी राहणे ही एखाद्याची तात्कालिक गरजही असू शकते. जपानी माणूस मूलतः समूहातच आनंदी राहणारा आणि रमणारा आहे. जपानी समाज आणि संस्कृती बदलते आहे. परंतु, एवढ्यावरूनच अशा निष्कर्षाप्रत येणे योग्य ठरणार नाही, असे या गटातील अभ्यासकांचे प्रतिपादन आहे. वाढत्या जागतिकीकरणामुळे नव्या जागतिक प्रवाहांशी जोडला गेलेल्या जपानी तरुणांचा दृष्टिकोन आता व्यापक झाला आहे. त्यामुळे प्रस्थापित सामाजिक चौकट त्याला बंधनकारक वाटते आणि स्वतंत्रपणे जगण्याची त्याची अभिलाषा तीव्र होते आहे. त्यामुळे अधिक मुक्त स्वातंत्र्य अनुभवण्यासाठी आनंद उपभोगताना तो स्वतःपुरता उपभोगावा, याकडे जपानी तरुणांचा कल आहे. लोक काय विचार करतील याचा दबाव मनावर राहिला की मोकळेपणाने व्यक्त होता येत नाही; त्याऐवजी एकाकीपणात मुक्तपणाने अभिव्यक्त होता येते, अशी जपानी युवकांची धारणा बनते आहे, अशीही या बदलाची तार्किक उपपत्ती काही अभ्यासक लावत आहेत.

**'सुपर सोलो सोसायटी'च्या दिशेने...**

जपानमधील वेगाने बदलणारे लोकसंख्येचे गणित हादेखील तितकाच कळीचा मुद्दा आहे. गेल्या काही वर्षांत, जपानमधील जन्मदर झपाट्याने कमी होतो आहे. २०१९ साली ८ लाख ६४ हजार मुले जपानमध्ये जन्माला आली. १८९९ सालापासूनच्या नोंदी पाहिल्या तर, लोकसंख्येमध्ये पडलेली आजवरची ही सर्वांत कमी भर असल्याची नोंद झाली आहे. या शिवाय, २०१५ सालच्या जपानी जनगणनेनुसार, १९९५ साली घरात एकाकी राहणा-या लोकांचे प्रमाण २५ टक्के होते ते वाढून २०१५ साली ३५ टक्क्यांवर गेलेले आहे. लग्न होण्याचे प्रमाणही जपानमध्ये सातत्याने घसरते आहे. त्याचबरोबर, घटस्फोटांची संख्याही वाढते आहे. एकाकी



राहणा-या विधवा आणि विधुर वयोवृद्धांची संख्याही जपानमध्ये मोठी आहे. एकाकी जगणारा एक मोठा वर्ग समाजात त्यांमुळेही वाढतो आहे. त्यामुळेच, जपानी समाज हा आता 'सुपर सोलो सोसायटी'च्या दिशेने जातो की काय, अशी चिंता व्यक्त केली जाते आहे. या संकल्पनेचा अभ्यास करणारे संशोधक Kazuhisa Arakawa यांच्या मते, जपानमधील नवे सामाजिक बदल दुर्लक्षून चालणार नाहीत. जपानमधील १५ वर्षे आणि त्यापेक्षा अधिक वयाचे ५० टक्क्यांपेक्षा अधिक तरुण हे २०४० सालापर्यंत स्वतंत्रपणे एकट्यानेच राहणे पसंत करतील, असा अंदाज आहे. जर अशी परिस्थिती राहणार असेल तर, बाजारपेठेलाही अशा स्वतंत्र राहणा-या लोकांच्या गरजांकडे विशेषत्वाने येत्या काळात लक्ष द्यावेच लागेल. त्याचीच सुरुवात आता झालेली आहे. लग्न झालेल्या प्रत्येक तीन जपानी माणसांमागे एक जण वर्षातून किमान एक-दोनदा तरी पर्यटनासाठी एकटाच बाहेर पडतो आणि मुक्त स्वातंत्र्य उपभोगतो. स्त्रियांच्याबाबतीत विचार करायचा झाला तर मात्र त्यांनी स्वतःहून स्विकारलेली आणि समाजाची म्हणून असलेली मानसिक बंधने अधिक असतात. त्यामुळे पुरुषांच्या तुलनेत त्यांचे प्रमाण कमी आहे, असा काही संशोधकांचा दावा सांगतो.

केवळ जपानमध्येच नव्हे, तर हे लोण हळूहळू अनेक देशांमध्ये पसरू लागले आहे. एकेकट्याने आनंद उपभोगण्याची नवी जीवनशैली लोकांच्या अंगवळणी पडते आहे. त्यामुळेच, युवकांमध्ये 'सोलोडेट' ही संकल्पना लोकप्रिय होताना दिसते त्याच्याच जोडीला 'सेल्फपार्टनर' ही एक नवीन संकल्पना मूळ धरते आहे. कुणीही सोबत नसण्याला आणि फक्त स्वतःच स्वतःसोबत असण्याला तिथे महत्त्व आहे. आपण एकट्याने जगू शकतो हे दाखवणारी प्रकाशचित्रे समाजमाध्यमांवर प्रदर्शित करायला त्यांमुळेच तरुणांना आवडू लागले आहे. हे सगळे प्रवाह पाहता हे लोण आणखी काही वर्षांत भारतातही आल्याचे दिसू लागल्यास त्यात नवल वाटण्यासारखे काहीही नाही. मात्र, समाजप्रिय असणारा माणूस जेव्हा स्वतःच्याच सोबतीत एकट्याने राहणे पसंत करू लागतो तेव्हा प्रस्थापित समाजव्यवस्थेच्या चौकटीत काही चुकत तर नाही ना, हे पाहणे व त्यात सुधारणा करणे अगत्याचे ठरते. ■■

*(पृष्ठ क्रमांक १४ वरून)*

परमसाध्य मानून त्यासाठीच प्रयत्नशील राहिले पाहिजे, ही त्या विचारव्यूहाची गाभाशिकवण. तत्कालीन पारंपरिक धर्मविचाराने जिची महत्ता सर्वोच्च मानलेली होती ती मोक्षमुक्तीची संकल्पना स्वरूपतःच व्यक्तिकेंद्रीत होती. त्या व्यक्तिकेंद्रीततेच्या ऐवजी 'फड' ही समूहवाचक संकल्पना रूढ करणे, ही नामदेवांची वैशिष्ट्यपूर्ण देणगी. भागवत धर्मविचाराने प्रसृत केलेल्या भक्तितत्त्वाचे लोकसंग्रह हे जे दुसरे अंग त्याचे प्राथमिक रूप म्हणजे सामूहिकता अथवा समाजभावना. 'समाज' नावाची समूहप्रधान संस्था त्यांद्वारे तत्कालीन चिंतनविश्वाच्या केंद्रस्थानी आली अथवा आणली गेली.

भागवत धर्माने प्रवर्तित केलेल्या भक्तिसंकल्पनेच्या 'नामचिंतन' या पहिल्या आणि सर्वांत महत्त्वाच्या अंगाला शिरोधार्य मानत नामदेवांनी जो नामयज्ञ संपूर्ण जीवनभर आचरला त्याने त्या काळातील केवळ धार्मिक-आध्यात्मिकच नव्हे तर सामाजिक-सांस्कृतिक व्यवहारातही अपूर्व असे स्थित्यंतर घडवून आणले. भागवत धर्मविचारातील 'नामस्मरण' या उपासना साधनाचे केवळ आणि केवळ आध्यात्मिक पैलूच काय ते आजवर उदंड चर्चिले गेलेले आहेत. या साधनाने जे सामाजिक अभिसरण त्या कर्मकठोर वातावरणात शक्य बनविले आणि भागवत धर्मविचारानेच आदर केलेल्या ऐहिक जीवनदृष्टीचे व्यवहारात संगोपन-संवर्धन घडविण्यास ज्या प्रगल्भपणे अवकाश प्राप्त करून दिला त्या पैलूंचे आकलन अगदी आजही म्हणावे तितके प्रकर्षाने होतेच अथवा झालेले आहे असे ठामपणे म्हणता येणार नाही. बाटविटाळाच्या भावनेचे अवडंबर माजविलेल्या तत्कालीन धर्मव्यवहाराने काही समाजघटकांना मंदिरप्रवेश नाकारलेला होता. आराध्य दैवताच्या समूर्त दर्शनापासून वंचित राखलेल्या त्या यच्चयावत समाजसमूहांना नामस्मरणाच्या माध्यमातूनच आराध्याच्या रूपदर्शनाचा सोहळा उपभोगण्याचा आगळा पर्याय प्रशस्त बनविला तो नामदेवांनी.

***नाम तेंचि रूप रूप तेंचि नाम । नामारूपा भिन्न नाहीं नाहीं ।।***
***आकारला देव नामारूपा आला । ह्मणोनी स्थापिले नामवेदीं ।।***

हे त्यांचे उद्‌गार, भागवत धर्मविचाराने या भूमीत सक्रिय बनविलेल्या समांतर प्रवाहाचे स्पष्ट सूचन करतात.



**लढाऊ आत्मभान**

भेदप्रवण अशा तत्कालीन धर्मव्यवहाराने उपेक्षेचे दान पदरी घातलेल्या समाजसमूहांच्या हाती नामजपरूपी साधन देऊन नामदेवांनी एक लढाऊ आत्मभान त्यांच्या ठायी जागविले. मंदिरांच्या चार भिंतींमध्ये आणि बंद कवाडांच्या आड देवाला लपवत त्याच्या दर्शनापासून भक्तांना वंचित राखण्याची धर्ममार्तंडांची उद्दाम आणि विषमतापूर्ण दंडेली नाम आणि रूप यांच्यातील अभेदापायी पूर्णपणे अप्रस्तुत ठरली आणि ठरणार होती. मंदिरप्रवेश नाकारून आराध्य दैवताच्या रूपदर्शनाला आडकाठी करण्याने संबंधित दीन-उपेक्षित जनसमूहांचे आता काहीच अडणार नव्हते. कारण, देवळातील मूर्तीच्या प्राकृतिक-भौतिक दर्शनापेक्षा दैवताच्या नामजपाद्वारे घडणारे त्याचे नित्य दर्शन नामसाधकाची स्वायत्तता जपत त्याला दर्शनाचे सुख मिळवून देणार होती. ही झाली या वास्तवाची व्यावहारिक बाजू. नामस्मरणाचे नामदेवप्रणित हे साधन असे व इतके आगळे प्रभावशाली होते की, एकीकडे नामसाधकाची स्वायत्तता बुलंद बनवत असतानाच त्याने 'देव'नामकतत्त्वाची स्वायत्तता संपूर्णपणे खालसा करून त्याला अंकित बनविलेले होते. नामसाधकाला दर्शन द्यावयाचे अथवा नाही, हा आता देवाच्या मर्जीचा प्रश्न राहिलेला नव्हता. नामजपाच्या साधनाचा हा पूर्णतः अपूर्व आणि अजोड पैलू नामदेव,

***लपालासि तरी नाम कैसें नेसी । आह्मी अहर्निशी नाम गाऊं ।।१।।***
***आह्मापासूनियां जातां नये तुज । तें हें वर्म बीज नाम घोकूं ।।२।।***
***आह्मासी तों तुझें नामचि पाहिजे । मग भेटी सहजें देणें लागे ।।३।।***
***भोळीं भक्तें आह्मी चुकलों होतों वर्म । सांपडलें नाम नामयासी ।।४।।***

अशा शक्तिभारित शब्दकळेद्वारे प्रगट करतात.

प्रत्यक्ष 'देव'तत्त्वालादेखील आपला अंकित बनवण्याइतके सामर्थ्य असलेले हे नामजपाचे साधन मोक्षप्राप्तीसाठीच पूज्य नाही तर, नामधारणेद्वारा लौकिक जीवनाचा पोत अंतर्बाह्य बदलून जाणे अपेक्षित आहे, हा भागवत धर्मविचाराने प्रवर्तित केलेला दृष्टिकोन अगदी आजही रुजलेला नाही. नामजप हे सामाजिक अभिसरणाचे प्रभावी उपकरण होय, याचे नेमके भान नामदेवांना असल्याचे रोकडे दाखले त्यांच्या विचारविश्वात आढळतात.

याज्ञिकांचा यज्ञ म्हणजे उच्चवर्णियांची मक्तेदारी होती. मात्र, नामयज्ञाचा अधिकार सर्व समाजघटकांना खुला असल्याचे खणखणीत प्रतिपादन नामदेव, ***‘ब्राह्मण व शूद्र वैश्य नारीनर । सर्वांसी आधार नाम सत्य ।।’*** इतक्या निःसंदिग्ध शब्दांत करतात. देवाचे नाम आणि रूप या दोहोंतील अभेदाचा पुकारा करीत, याज्ञिकांच्या यज्ञवेदीच्या ठिकाणी नामवेदीची स्थापना करीत वंचित समाजघटकांना नामयज्ञाचे अधिकारी बनविले ते नामदेवांनी. निदान भक्तीच्या प्रांतातील सामाजिक अभिसरणाच्या वाटा तरी यामुळे खुल्या झाल्या.

तुर्कांनी कॉन्स्टंटिनोपलवर कब्जा केल्यानंतर तिथून परागंदा झालेल्या विद्वानांनी इटलीमध्ये येताना ग्रीक आणि लॅटिन या दोन भाषांमधील अभिजात ग्रंथसंपदाही आपल्या बरोबर आणलेली होती. इटलीमधील शांत वातावरणात ग्रीक आणि लॅटिन या भाषांमधील अभिजात ज्ञानसाठ्याचे नवदृष्टीने आकलन-अवगाहन करण्यास त्या विद्वानांना अवसर मिळून प्राचीन अशा संचित ज्ञाननिधीचे पुनरुज्जीवन त्यांद्वारे घडून आले. भागवत धर्मविचाराचा अंगीकार केलेल्या विवेकशीलांनी, जवळपास त्याच धर्तीवर, या संस्कृतीमधील प्राचीन व पूज्य गणल्या जाणा-या वेदादिकांचा धांडोळा नव्या मूल्यसंचिताच्या आधारे घेण्यास सुरुवात केली. वैदिक परंपरेचा आणि पारंपरिक संचित ज्ञानाचा तत्कालीन वैदिकांनी लावलेला अर्थ आणि त्यांतून प्रचलीत झालेला लोकव्यवहार कितपत यथार्थ आहे, हे मुळापासून शोधण्याची ऊर्मी त्या उपक्रमामागे होती. त्या प्रेरणेमागील बिनीचे सरदार ठरतात नामदेव. वेदविहित तत्त्वांच्या व्यवहारात रूढ असलेल्या अर्थापेक्षा वेदांना अगदी निराळेच असे आणि मुख्य म्हणजे मानवतेचे आद्य मूल्य जतन करणारे काही तरी सांगायचे आहे, अशा निष्कर्षास नामदेव येऊन पोहोचतात. आपला हा निष्कर्ष ते,

***वेदांचे महिमान जनीं जनार्दन । आणिक वचन तेथें नाहीं ।।१।।***
***भूतदया धरा भक्तिभावें करा । भजन हरिहरां वेद सांगे ।।२।।***
***सर्व हेंचि सार ब्रह्ममय खरें । आणिक दुसरें न दिसे आह्मां ।।३।।***
***नामा म्हणे समर्थ वेद तो आमुचा । सांगे नित्य जपा रामकृष्ण ।।४।।***

इतक्या निःसंदिग्ध शब्दांत मांडतात. नामस्मरणाची परिणती भूतदयेमध्ये



घडून येणे अपेक्षित आहे आणि म्हणूनच वेदही नामजपाचा उपदेश करतात, हा नामदेवप्रणित वेदपरंपरेचा अन्वय भागवत धर्माने बीजारोपण केलेल्या इहवादी जीवनदृष्टीशी सुसंवादी असाच आहे.

नामसंकीर्तनाद्वारे दया, क्षमा, शांती यांसारख्या मानवी जीवनाची सुभग धारणा करणा-या मूल्यांचा परिपोष लोकव्यवहारामध्ये घडून यावा, हा नामदेवांचा नामवेदाचा घोष करण्यामागील मुख्य हेतू होय. ***‘दया शांति क्षमा हें चि पैं भूषण । नामसंकीर्तन अहर्निशी ।।’*** अशा शब्दांत नामदेव नामसंकीर्तनाचा ऐहिक जगण्याचा मूल्यात्मक स्तर उंचावण्याशी असलेला संबंध स्पष्ट करतात. भागवत धर्माने प्रवर्तित केलेल्या याच मूल्यसंचयाचा प्रसार करण्यासाठी नामदेवांनी थेट पंजाबातील घुमानपर्यंत त्या काळात पायपिटी केली. नामदेवांच्या सप्तशतकोत्तर सुवर्णमहोत्सवी जन्मस्मरणाच्या निमित्ताने आज उजळणी करायची ती त्यांच्या वाणीमधून प्रसवलेल्या भागवत धर्मप्रणित जबाबदार ऐहिकतेच्या त्याच गाभामूल्यांची. ■■

**मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन**

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत १९व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणा-या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

**तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ**

**लेखक - नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५ किंमत : ३००/- रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

संशोधन

# ऊर्जावापराचे नवे पर्याय

विजेवर चालणाऱ्या उपकरणांच्या संदर्भात, 'चार्ज' करता येणाऱ्या बॅटरीचा शोध ही एक महत्त्वाची उपलब्धी मानली जाते. कारण, विजेवरची उपकरणे 'चार्ज' करीत बसण्यापेक्षा चार्जिंग केलेल्या बॅटरीमध्ये साठवलेल्या ऊर्जेचा वापर करून उपकरणे वापरता येऊ शकतात ही बाब उपयुक्तता वाढवणारी आणि वेळेची मोठी बचत करणारी ठरली. त्यामुळे विजेवर चालू शकणाऱ्या उपकरणांमध्ये बॅटरी हा एक महत्त्वाचा भाग ठरू लागला. अल्पावधीतच जगभरात बॅटरीयुक्त उपकरणांचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर सुरू झाले. लिथियम या धातूचा वापर करून बॅटरीची निर्मिती केली जाते. मात्र, त्यात वापरण्यात येणारा हा धातू पर्यावरणाच्या दृष्टीन धोकादायक असल्याचे मानले जात असल्याने पर्यावरणपूरक असे नवे पर्याय शोधावेत, अशी मागणी आता जगभरातून जोर धरू लागली आहे. त्यामुळेच नव्या आधुनिक, शाश्वत पर्यायांची निकड अधिक भासू लागली आहे.

John B. Goodenough, M. Stanley Whittingham and Akira Yoshino या तीन रसायनशास्त्रज्ञांना २०१९ साली नोबेल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. Lithium-Ion बॅटरींमध्ये गुणात्मक सुधारणा करणारे संशोधन त्यांनी केले आहे. त्या निमित्ताने, हा विषय पुन्हा एकदा ऐरणीवर आलेला आहे. भविष्याच्या दृष्टिकोनातून विचार करता, वाहनांसाठी लागणाऱ्या इंधनांचा तुटवडा आणि त्याच्या सातत्याने वाढणाऱ्या किंमती लक्षात घेता आता विजेवर चालू शकणाऱ्या वाहनांचे उत्पादन वाढणार आहे. मोबाइल, टॅब्लेट, लॅपटॉप यांचाही वापर दिवसेंदिवस वाढतो आहे. त्यामुळे दीर्घकाळ टिकणारी, पटकन 'चार्ज' होणारी आणि पर्यावरणाचे नुकसान न करणारी बॅटरी विकसित करणे गरजेचे बनले आहे. Lithium-Ion बॅटरी उपयुक्त असल्या तरी त्यांच्या अनेक मर्यादाही आहेत. अशा बॅटरी एकदा 'चार्ज' केल्यानंतर लवकर 'डिस्चार्ज' होतात. या शिवाय, या प्रकारातील बॅटरीमध्ये मोठ्या प्रमाणावर ऊर्जा साठवून ठेवता येत नाही.



अत्यंत उष्ण आणि अतिशय थंड वातावरणामध्ये बॅटरीची परिणामकारकता कमी होते. त्यामुळे या सगळ्यांवर मात करून त्यांची उपयुक्तता कशी वाढवता येईल, या दिशेने संशोधन सुरू आहे. या बॅटरीचा वापर अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर होत असला तरीही त्यांच्या संदर्भात सुरक्षितता हा कायमच गंभीर मुद्दा राहिलेला आहे. त्यात ज्वलनशील पदार्थ असल्याने आगीच्या संपर्कात आल्यास ते चटकन पेट घेऊ शकतात आणि स्फोट होऊ शकतो. त्यामुळे हा एक मोठा धोका आहे. अशा बॅटरीचे उत्पादन करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर खनिजसंपत्ती लागते. त्यामुळे पर्यावरणाचे आणि समाजाचेही खूप नुकसान होते. या बॅटरी दीर्घकाळ टिकत नाहीत हीदेखील एक मोठी मर्यादा आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर, Lithium-Ion बॅटरीचा वापर थांबवून, त्यातील मर्यादांवर मात करून काही नवे सक्षम पर्याय उभे करावेत असा प्रयत्न जगभरातील संशोधक करीत आहेत. अगदी फेकून दिलेल्या फळांपासून ते पैलू पाडलेल्या हिऱ्यांचा वापर करून अधिक शक्तिशाली, दीर्घकाळ टिकणाऱ्या आणि पर्यावरणाची कमीत कमी हानी करणाऱ्या बॅटरी तयार करता येऊ शकतात, असे संशोधकांच्या लक्षात आले आहे.

नव्या पर्यायांचा वेध घेण्यापूर्वी सध्या वापरात असलेल्या Lithium-Ion बॅटरीची रचना आणि कार्यपद्धती समजून घेणे आवश्यक ठरते. बॅटरीमध्ये निगेटिव्ह इलेक्ट्रोड, पॉझिटिव्ह इलेक्ट्रोड आणि इलेक्ट्रोलाइट हा द्रवपदार्थ यांचा समावेश असतो. Lithium-Ion बॅटरीमध्ये लिथियम धातूचे बारीक बारीक तुकडे असतात. बॅटरी 'चार्ज' होते तेव्हा हे लिथियमचे तुकडे आणि इलेक्ट्रॉन्स कॅथोडकडून ॲनोडकडे वाहू लागतात. इलेक्ट्रोकेमिकल स्वरूपात ते बॅटरीमध्ये साठवून ठेवले जातात. एखादे उपकरण आपण वापरतो तेव्हा त्या बॅटरीतील 'चार्ज' केलेली ऊर्जा वापरली जाऊन हा प्रवाह बरोबर उलटा म्हणजेच ॲनोडकडून कॅथोडकडे वाहू लागतो. अन्य पर्यायांच्या तुलनेत Lithium-Ion बॅटरी अधिक प्रभावशाली ठरतात. त्यामुळे, त्यांतील दोष दूर करून आणि मर्यादांवर मात करून बॅटरीची गुणवत्ता, क्षमता आणि परिणामकारकता वाढवण्याच्या दिशेने बरेच प्रयत्न सातत्याने सुरू आहेत. मोबाइलची बॅटरी 'चार्ज'

करताना उपकरणाचा स्फोट होण्याच्या घटना गेल्या काही वर्षांत समोर आल्या आहेत. त्यामुळे यातील जीवावर बेतणारे धोके कायमस्वरूपी कमी कसे करता येतील यावर भविष्यातील संशोधनाचा भर राहील.

ऑक्सफर्ड विद्यापीठातील एक संशोधक Mauro Pasta यांनी या विषयात सखोल संशोधन केलेले आहे. त्यांच्या मते, गेल्या अनेक वर्षांपासून Lithium-Ion बॅटरीचा उपयोग होत असला तरीही आता त्याही पलीकडे जाऊन विचार करण्याची, नवे पर्याय शोधण्याची वेळ येऊन ठेपलेली आहे. एखादे उपकरण बॅटरीच्या मदतीने वेळोवेळी 'चार्ज' केल्यानंतरसुद्धा बॅटरीचे 'चार्जिंग' अधिकाधिक काळ कसे टिकवता येईल आणि त्याचबरोबर त्याची परिणामकारकता कशी वाढवता येईल याचा विचार होणे गरजेचे आहे. आधुनिक पद्धतीच्या बॅटरी विकसित करताना बॅटरीमध्ये वापरल्या जाणा-या अत्यंत ज्वलनशील द्रवपदार्थांचा धोका कसा कमी करता येईल यावरही संशोधनात भर दिला जातो आहे. Mauro Pasta यांच्या मते, येत्या काही वर्षांत या संशोधनांना यश येईल आणि अधिक सुरक्षित बॅटरी निश्चितपणे उपलब्ध होतील. त्या दृष्टीने 'सॉलिड सेमीकंडक्टर्स'चा वापर अधिक प्रभावी ठरेल, असे या क्षेत्रातील जाणकारांचे मत आहे. या माध्यमातून बॅटरी तयार केल्या तर अधिक प्रमाणात त्यांत ऊर्जा साठवणे शक्य होऊ शकते आणि कोणत्याही कारणांमुळे स्फोट होण्याचा धोकाही कमी होतो. विजेवर चालणा-या वाहनांची संख्या आणि प्रकार आगामी काळात वाढत जाणार असल्याने प्रभावी क्षमतेच्या बॅटरी गरजेच्या ठरणार आहेत. आजमितीला मोबाइल फोनमध्ये ज्या क्षमतेची बॅटरी वापरली जाते त्याच्या किती तरी प्रमाणात अधिक क्षमता असणारी बॅटरी विजेवर चालणारी मोटरगाडी किंवा दुचाकी चालवण्यासाठी आवश्यक असते. विजेवर चालणारी वाहने लांब अंतराच्या प्रवासासाठी वापरणे सुलभ व्हावे आणि बॅटरी वारंवार उतरू नये, ही येत्या काळाची गरज असल्याने आधुनिक काळात या प्रकारांतील बॅटरीचा वापर वाढण्याची शक्यता वर्तवली जाते आहे.

Lithium-Ion लाच पर्याय ठरू शकतील अशा नव्या पद्धतीच्या बॅटरी कशा विकसित करता येतील यावर जागतिक स्तरावर विचारमंथन आणि प्रयत्न सुरू झालेले आहेत. सद्यःस्थितीत Lithium-Ion बॅटरीच्या



उत्पादनासाठी लागणारी खनिजसंपत्ती ही अर्जेंटिना, बोलिव्हिया आणि चिली या देशांतून प्रामुख्याने प्राप्त होते. परंतु, या खनिजांवर साठलेले क्षार दूर करण्याची प्रक्रिया करण्यासाठी खूप मोठ्या प्रमाणावर पाणी लागते. उदाहरणादाखल सांगायचे झाले तर, ९०० किलो इतके चांगले शुद्ध स्वरूपातील लिथियम प्राप्त करण्यासाठी सुमारे दहा लाख लिटर पाणी वापरावे लागते. लिथियम आणि तांब्याच्या खाणींमध्ये पाण्याचा वापर बेसुमार होत असल्याने त्यावर नियंत्रण आणणे गरजेचे असल्याचा इशारा संबंधित देशांनी खाणमालकांना दिलेला आहे. त्यामुळे आता लिथियम ऐवजी पर्याय म्हणून कॅल्शियम किंवा मॅग्निशियम या धातूंचा संपूर्णतः नव्याने वापर करून बॅटरी विकसित करता येतील का, या दिशेनेही संशोधन सुरू झालेले आहे. मुबलक उपलब्धतेच्या दृष्टीने विचार करावयाचा झाल्यास, खनिजसंपत्तीमध्ये कॅल्शियम हे पहिल्या पाच क्रमांकामध्ये आहे. परंतु, लिथियमप्रमाणेच त्यातही अनेक अडचणी आहेत. त्या तुलनेत मॅग्नेशियमच्या प्राथमिक चाचण्या यशस्वी ठरलेल्या आहेत. त्यामुळे बॅटरी उत्पादनासाठी भविष्यात मॅग्नेशियमचा वापर करण्याच्या दृष्टीने गांभीर्याने विचार सुरू आहे.

एका बाजूला हे प्रयत्न सुरू असताना, निसर्गात ज्या गोष्टी अगदी सहजतेने उपलब्ध आहेत त्यातून ऊर्जा प्राप्त करून ती कशी साठवता येईल, याचाही विचार आणि त्या दिशेने विविध प्रयोग सुरू आहेत. अमेरिकेतील University of Maryland मधील 'सेंटर ऑफ मटेरियल इनोव्हेशन'चे संचालक Liangbing Hu यांनी लाकडाच्या मदतीने बॅटरी विकसित केलेली आहे. विपुल प्रमाणात उपलब्धता, कमीत कमी खर्च आणि हलके वजन अशी अनेक वैशिष्ट्ये असणारे लाकूड हा एक चांगला पर्याय ठरू शकतो, असे समोर येते आहे. हा प्रयोग यशस्वी ठरला असला तरीदेखील तो प्राथमिक अवस्थेत असल्याने त्याचा व्यावहारिक वापर किती चांगला होऊ शकेल, लाकडाचा वापर टिकाऊ ठरेल का, या संबंधातील चाचण्या होणे गरजेचे आहे. वाया जाणा-या अन्नापासून ऊर्जा बनवता येऊ शकेल का याच्याही शक्यता अजमावून पाहिल्या जात आहेत. अलीकडेच University of Sydney मधील संशोधक Vincent

Gomes आणि त्यांच्या चमूने 'ड्युरियन' हे जगातील सर्वांत सुगंधित हे फळ आणि सर्वांत मोठे फळ गणला जाणारा फणस यांच्यापासून ऊर्जा मिळवण्याचा प्रयत्न केला आहे. यातून जी ऊर्जा प्राप्त होते त्याद्वारे मोबाइल, टॅब्लेट आणि लॅपटॉप अशी उपकरणे अवघ्या मिनिटभरात 'चार्ज' होऊ शकतात, असा संशोधकांचा दावा आहे. या फळांच्या माध्यमातून प्राप्त होणारी ऊर्जा साठवली तर 'सुपर कपॅसिटर्स' म्हणून ते काम करू शकतात व भविष्यात या फळांचा बॅटरीसाठी प्रत्यक्ष वापर शक्य आहे, असा संशोधकांचा दावा आहे. दीर्घकाळ टिकू शकतील अशी बॅटरी विकसित करण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून University of Bristol मधील पदार्थविज्ञानाचे शास्त्रज्ञ Tom Scott आणि त्यांच्या संशोधक चमूने हि-यांचा वापर करून बॅटरीचे एक प्रारूप तयार केलेले आहे. इतकेच काय तर, आण्विक कच-यातूनही ऊर्जानिर्मिती करण्याच्या दिशेने प्रयत्न सुरू आहेत.

या क्षेत्रात होत असलेले हे महत्त्वाचे प्रयत्न पाहता ऊर्जा वापरासाठीचे हे नवनवे पर्याय मानवी जीवनात आणखी सुलभता आणतील, अशी आशा आहे. कोणत्याही प्रकारच्या हवामानात तग धरू शकणा-या, पर्यावरणपूरक असलेल्या, दीर्घकाळ टिकणा-या, कोणत्याही कारणाने स्फोट होण्याचा धोका नसलेल्या बॅटरी व्यवहारात आणण्याच्या दिशेने सुरू असलेले सारे प्रयत्न निश्चित महत्त्वाचे आहेत. ■■

**संदर्भ :**

(१) https://www.bbc.com/future/article/20200724-the-battery-made-from-diamonds-that-could-last-1000-years

२) https://www.pocket-lint.com/gadgets/news/130380-future-batteries-coming-soon-charge-in-seconds-last-months-and-power-over-the-air

(३) https://www.livekindly.co/sydney-renewable-energy/

(४) भारतीय समाजविज्ञान कोश, संपादक - स. मा. गर्गे, खंड ३, समाजविज्ञान मंडळ, पुणे, १९८९, पृष्ठ क्रमांक २४० ते २४४.

(५) संत नामदेव गाथा, संपादक - नानामहाराज साखरे, वरदा प्रकाशन, पुणे.



## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

## 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

## अर्थबोधपत्रिका मासिक : वर्गणीदारांसाठी विशेष योजना

| | |
|---|---|
| **वार्षिक वर्गणी** | **फक्त २०० / - रुपये** |
| **द्वैवार्षिक वर्गणी** | **फक्त ३५०/ - रुपये** |
| **त्रैवार्षिक वर्गणी** | **फक्त ५००/ - रुपये** |
| **पंचवार्षिक वर्गणी** | **फक्त ८०० /- रुपये** |

# ग्रंथालयातील नवीन पुस्तके

## Essays on the Econometrics of Inflation, Consumption and Welfare.

**By - R. Radhakrishna**

**Academic Foundation in association with Centre for Economic and Social Studies (CESS) and Institute of Public Enterprieses, both Hyderabad, 2019, pp. 458.**

गणित आणि संख्याशास्त्र हे दोन विषय आता अर्थशास्त्राशी अभिन्नपणे जोडले गेलेले आहेत. या अर्थाने आणि या पुरते तरी अर्थशास्त्राचे अध्ययन-अध्यापन आता आंतरविद्याशाखीय बनलेले आहे. गणित आणि संख्याशास्त्र या दोन विषयांचे व त्यांत अंतर्भूत असलेल्या प्रक्रिया-पद्धतींचे पुरेसे ज्ञान असणे ही आता अर्थपूर्ण अशा अर्थशास्त्रीय अध्ययन-अध्यापन-संशोधन या तीनही प्रांतांतील अनिवार्य अशी पूर्वअट ठरूलागलेली आहे. प्रस्तुत पुस्तक त्यांमुळेच या तीनही विद्याशाखांच्या जिज्ञासूंना रोचक ठरेल. कोणत्याही अर्थव्यवस्थेतील उत्पन्नाचे विभजन, अन्नधान्याचे बाजारभाव आणि अन्नधान्याची खरेदी/उपभोग या तीन बाबींचा परस्परांशी घनिष्ठ आंतरसंबंध असतो. अन्नधान्यांच्या बाजारभावांतील बदलांचा थेट परिणाम ग्राहकांच्या वास्तव उत्पन्नावर आणि पर्यायाने त्यांच्या कुटुंबाच्या एकंदर घरखर्चाच्या जडणघडणीवर घडून येत असतो. या चढउतारांचे घाऊक पातळीवर परिणाम जाणवून येतात ते अन्नधान्ये आणि अन्नधान्येतर जिनसांना अर्थव्यवस्थेमध्ये निर्माण होणा-या तौलनिक मागणीवर आणि तिच्यातील बदलांवर. अन्नधान्यांच्या किमतींमध्ये घडून येणा-या स्थित्यंतरांचा थेट प्रभाव दिसतो तो दोन घटकांवर. सर्वसामान्यांच्या सरासरी कल्याणाची पातळी आणि अन्नसेवनाद्वारे शरीराला मिळणारी पोषणद्रव्ये हे ते दोन घटक. उत्पन्नाच्या विभजनातील विषमता आणि क्रयशक्तीचा होणारा -हास या दोहोंपायी व्यापक स्तरावर जरी अन्नधान्याची मुबलकता दिसून येत असली तरी व्यवहारात अनेक समाजसमूह कुपोषणाचे बळी ठरत राहतात. या सगळ्या आंतरसंबंधांचा, त्यांत होणा-या बदलांचा इकॉनॉमेट्रिक सूत्रे-संकल्पनांचा वापर करत या ग्रंथात घेतलेला मागोवा सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासकांना उद्‌बोधक ठरावा. ■■



**RNI Regn.No. MAHMAR/2002/9806**
**Published and Posted at Model Colony Post Office Pune, on 10th of each month**

## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग -व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक ('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते. ■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणा-या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक व्ही. एस. चित्रे यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**